पुण्य नगरी

# 'रवळनाथ 'तर्फे कर्तृत्ववान स्त्री शांताबाई यादव यांचा सन्मान

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानित शांताबाई यादव यांचा श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या आरोग्यासाठी १५ हजारांची आर्थिक मदतही देण्यात आली.

रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते आर्थिक मदत, तर संचालिका मीना रिंगणे यांच्या हस्ते यादव यांचा सन्मान करण्यात आला.

एम. एल. चौगुले म्हणाले, खडतर जीवनप्रवास असतानाही शांताबाईंनी जिद्दीने चारही मुलींचे संगोपन, शिक्षण पूर्ण केले. आज त्यांच्या चारही मुली स्थिरस्थावर आहेत. शांताबाईंचे हे कार्य महिला सबलीकरण चळवळीला प्रेरणा देणारे आहे.



**गडहिंग्लज : शांताबाई यादव यांना आर्थिक मदत देऊन सन्मान करताना मीना रिंगणे. सोबत एम. एल. चौगुले व अन्य.**

यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, आजरा अर्बन बँकेचे तज्ज्ञ संचालक मनोहर कावेरी, संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे, महेश मजती सीईओ डी. के. मायदेव, उमा तोरगल्ली, उत्कर्षा पोतदार, प्राची मायदेव, संतोष महाले, संगीता महाले, पूजा जाधव आदी उपस्थित होते. संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले. संचालिका रेखा पोतदार यांनी आभार मानले.